# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./3007/२०१७ दि. ०१/११/२०१७

प्रति,

**मा. प्राचार्य**

**सर्व संलग्नित महाविद्यालये ,**

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय :- राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत.**

संदर्भ :- मा. सहसचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. संकीर्ण- २०१७/प्र.क्र. ४०/विशि-३ दि. २७/१०/२०१७ चे पत्र

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक संस्थेच्या परिसरात सी.सी.टी. व्ही. कॅमेरे बसविले आहे काय ? सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र लावणे बंधनकारक केलेले आहे काय ? योग्य त्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केली आहे काय ? इ. उपाययोजना करणे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे असल्यामुळे संदर्भीय पत्रान्वये मा. सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी कळविलेले आहे. करीता सदर बाबतीत संलग्नित पत्राचे अवलोकन करून शासनास सदर बाबत तात्काळ १० दिवसाचे आत आपले स्तरावर कळविण्यात यावे तसेच एक प्रत विद्यापीठाकडे तात्काळ पाठविण्याचे करावे.

संलग्न:- संदर्भीय पत्र.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी :-

१) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय , मुंबई
२) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय , मुंबई
३) मा. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय , मुंबई
४) मा. सिध्दार्थ खरात , सहसचिव , महाराष्ट्र शासन

ई-मेल व्दारे

महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ५४०/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७/१०/२०१७.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आवक क्र. 3043 31.10.17
जावक क्र.............दि.............

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 6744 दि. 31/10/17

प्रति,

कुलगुरु/कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय :- राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अलीकडच्या काळात वर्तमानपत्र/इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर होणारे रॅगिंग, दहशत, लैंगिक शोषण इ. बाबी निदर्शनास येत आहेत.

२. विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता पहाणे व त्यानुषंगाने पुरेशा उपाययोजना करणे ही बाब संबंधित शैक्षणिक संस्थेच्या कार्यकक्षेतील असली तरीही संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक संस्थेच्या परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेत ओळखपत्र लावणे बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे इ. उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

३. सबब, आपणास विनंती करण्यात येते की, आपण प्रस्तुत प्रकरणी व्यक्तीगत लक्ष घालून आपल्या विद्यापीठातील व आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपाययोजना करुन केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास १५ दिवसाच्या आत अवगत करावे, ही विनंती. सदर प्रकरणाबाबतचा अहवाल मा. राज्यमंत्री महोदयांना सादर करावयाचा असल्याने आपल्याकडून प्राधान्याने कार्यवाही अपेक्षित आहे.

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती.

Dr Dube DR (SW) For necessary action 31/10/17

31/10/17

826/19/9/17

विशजा.क्र.राम/गृ.नि.,उ.व तं.शि./ ७-११/२०१७ 9

राज्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

**रविंद्र दत्ताराम वायकर**
पालकमंत्री - रत्नागिरी जिल्हा

**राज्यमंत्री**
**गृहनिर्माण, उच्च व तंत्र शिक्षण**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

*www.maharashtra.gov.in*
ई-मेल : *stateminister.housing@gmail.com*

दिनांक : १९ सप्टेंबर,२०१७

विषय : महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात... .. ..

राज्यात दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाकडे कल वाढत असून, विद्यार्थी मोठया संख्येने राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमांना विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित होत आहेत. नवनविन अभ्यासक्रमांच्या मागण्यांमुळे नविन अभ्यासक्रमांच्या अतिरिक्त तुकडया अथवा नविन महाविद्यालयांची संख्या देखील झपाटयाने वाढत आहे.

अलीकडे महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षे संदर्भात वर्तमानपत्रातून अथवा इलेक्ट्रॉनिक मिडीयातून विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या रॅगिंग, दहशत, लैंगीक शोषण, प्रसंगी खुन इ. गंभीर घटनांमध्ये वाढ झाल्याचे बातम्यांतून कळते. यामुळे विविध विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न देखिल ऐरणीवर आला आहे. विद्यापीठे व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही संबधित शैक्षणिक संस्थेच्या प्रशासनाची आहे परंतु कांही शैक्षणिक संस्थांच्या शैक्षणिक परिसर व वसतिगृहे,ग्रंथालय,उपहारगृह इ.मध्ये सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस वरिल घटनांमध्ये वाढ होत आहे. त्याकरिता सर्व संबधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना म्हणून संपुर्ण शैक्षणिक परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे,सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र लावून महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे इत्यादि बाबींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे.

शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील असून त्यास गांभीर्याने घेणे गरजेचे असल्याने राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपाययोजना करण्याबाबत कळवून त्याचा अनुपालन अहवाल एक महिन्यात शासनास सादर करण्याबाबत सुचना आपल्यास्तरावरुन निर्गमित कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सत्वर मला अवलोकनार्थ सादर करावा.

(रविंद्र दत्ताराम वायकर)

25-9-17

प्रति,

अवर मुख्य सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

अपर मुख्य सचिव यांचे कार्यालय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.